POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२७२ ● मुंबई, रविवार, ०४ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## महाराष्ट्रात लवकरच राजकीय भूकंप!
### शरद पवारांनंतर काँग्रेसही राज्यात 'भाकरी' फिरवणार

**■मुंबई । प्रतिनिधी :**

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनंतर आता काँग्रेसमध्येही संघटनात्मक बदल होणार असल्याचे संकेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहेत. २०२५ हे वर्ष काँग्रेसने संघटनात्मक वर्ष म्हणून घोषित केले आहेत .देशभर काँग्रेसमध्ये बदल होतील त्याचबरोबर महाराष्ट्रातीलही संघटनेत बदल होतील असं सपकाळ यांनी सांगितले. जो जास्त भ्रष्टाचार करेल त्याला सरकार शब्बासकी देते अशी टीका राज्य सरकारच्या शंभर दिवसाच्या कारभारावर सपकाळ यांनी केली आहे. संविधानिक पद्धतीने अजित पवार मुख्यमंत्री झाले तर आनंदच होई. दुःख व्हायचं कारण नाही अशा शब्दात अजित पवार यांना मुख्यमंत्री होण्याच्या मुद्द्यावर हर्षवर्धन सपकाळ यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

विधानसभेतील दारुण पराभवानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पाठोपाठ आता काँग्रेसमध्ये भाकरी फिरणार आहे. आता काँग्रेसमध्येही संघटनात्मक बदल होणार आहे, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहेत. २०२५ मध्ये देशा बरोबरच महाराष्ट्रातही काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल होतील.

जो सर्वात जास्त फसवणूक आणि भ्रष्टाचार करतो त्याला सरकार शब्बासकी देत आहे आणि राज्य सरकारच्या शंभर दिवसाच्या कामगिरीवर हर्षवर्धन सपकाळ यांनी टीका केली आहे. त्यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबद्दलही भाष्य केलं. ते म्हणाले की, धनंजय मुंडे राजीनामा देण्यासाठी तयार नव्हते, जनतेच्या उद्रेकामुळे भीतीपोटी सरकारने मुंडेंचा राजीनामा घेतला.

ज्या ज्या ठिकाणी जातीजातीमध्ये तेढ निर्माण झाला आहे काही, चुकीच्या घटना घडतात त्या ठिकाणी सद्भावना यात्रा सुरू आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा हा नैतिकतेच्या मुद्द्यावर झालेला नाही. संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व्हायरल झाल्यानंतर संताप उसळल्यामुळे घाबरलेल्या सरकारने त्यांचा राजीनामा घेतला. धनंजय मुंडे राजीनामा द्यायला तयार नव्हते. गौतम अदानी आणि शरद पवार यांच्या भेटीवर सपकाळ यांनी बोलणं टाळलं. गौतम अदानी यांच्या भेटीवर शरद पवार यांनीच बोललेलं योग्य राहील. शक्तिपीठ महामार्ग हा गौतम अडाणी यांना रेड कार्पेट टाकण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांची खटाटोप सुरू आहे. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाला आम्ही विरोध करतो आहोत, असं त्यांनी स्पष्ट सांगितलं.

## एप्रिल सरला तरीही लाडक्या बहिणी प्रतीक्षेत!
### सरकारचं लाडक्या बहिणींकडे दुर्लक्ष?

**■मुंबई । प्रतिनिधी :**

महायुती सरकारची महत्वाकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही काही ना काही कारणांमुळे सतत चर्चेत असते. त्या अंतर्गत १५०० रुपयांचा निधी वेळेवर महिलांच्या खात्यवर येत नाहीये. आता मे महिना उजाडला तरी एप्रिल महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना काही मिळाला नाही. आता मे महिना सुरू झाला तरी महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले नाहीत. त्यामुळे राज्यातील कोट्यवधी लाडक्या बहिणींचं लक्ष आपल्या सन्मान निधीकडे लागलेत. यावरून आता विरोधकांनी टीका केलीये. महिलांना वेळेवर पैसे मिळत नसताना महिला, बाल विकास विभागाने कामगिरीत प्रथम क्रमांक कसा पटकावला असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला. तर सावत्र भावांनी लाडक्या बहिणींची चिंता करू नये असा पलटवार मंत्री संजय शिरसाट यांनी केलीय.

दरम्यान अखेर सरकारने लाडक्या बहिणींच्या निधीची व्यवस्था केली असून २ ते ३ दिवसांत लाभार्थ्यांना निधी मिळेल अशी माहीती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिलंय. ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण'' या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत एप्रिल महिन्याचा सन्मान निधी पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात येत आहे. पुढील २ ते ३ दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल आणि सर्व पात्र लाभार्थींना निधी थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होईल. या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठीचा सरकारचा संकल्प अधिक दृढ केला जात आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत लाभार्थी महिलांना महिनाअखेरीस २५ तारखेपर्यंत पैसे मिळतात. एप्रिल महिन्यात मात्र पैसे खात्यात जमा झालेले नाहीत. दरम्यान एप्रिल महिना हा आर्थिक वर्षाच्या सुरुवातीचा महिना असल्याने हप्ता जमा होण्यास विलंब झाल्याची माहिती आहे. आता २ ते ३ दिवसांत महिलांना निधी मिळणारेय. महायुती सरकारच्या १०० दिवसांच्या रिपोर्ट कार्डमध्ये महिला आणि बालविकास विभागाने बाजी मारली.त्यामुळे किमान आतातरी मंत्री आदिती तटकरेंनी याची जाणीव ठेवावी आणि लाडक्या बहिणींनी निधीसाठी प्रतीक्षा करायला लावू नये हि अपेक्षा.

**अदिती तटकरेंचं स्पष्टीकरण**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत एप्रिल महिन्याचा सन्मान निधी पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया आजपासून सुरु करण्यात येत असल्याची माहिती मंत्री अदिती तटकरेंनी दिलीय. पुढील २ ते ३ दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल आणि सर्व पात्र लाभार्थींना निधी थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होईल.या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठीचा सरकारचा संकल्प अधिक दृढ केला जात असल्याचे त्या म्हणाल्या.





गुरुवार दि. ८ मे रोजी
**"थॅलेसिमियामुक्त महाराष्ट्र"**
अभियान विविध डॉक्टरांचे तज्ज्ञांचे विचार
उपाय व घ्यावयाची काळजी यावर
संपूर्ण भारतातून तज्ज्ञांचे लेख अवश्य वाचा.

## लाडक्या बहिणींना एप्रिलचा हफ्ता देण्यासाठी कापला 'या' २ विभागांचा निधी!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने लाडकी बहीण योजना आणली. याअंतर्गत महिलांच्या खात्यात १५०० रुपये देण्यात आले. दरम्यान निवडणुकीनंतर ही रक्कम २१०० करणार असल्याचे आश्वासनदेखील देण्यात आले. आता लाडक्या बहिणींना २१०० रुपयांची आस लागली आहे. पण आम्ही असे बोललोच नव्हतो, असे विधान महायुतीच्या नेत्यांकडून केलं जातंय. पण लाडक्या बहिणींना हफ्ता देण्यासाठी सरकारला तिजोरी खाली करावी लागत असल्याचं चित्र समोर येतंय. एप्रिलचा हफ्ता देण्यासाठी २ विभागांचे हफ्ते वळते केल्याची माहिती समोर आलीय. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सरकारच्या घशातील काटा बनलीय का अशी शंका उपस्थित होऊ लागलीय. कारण लाडक्या बहिणींना पैसे देण्यासाठी वित्त विभागाने आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभागाचा अनुसूचित जाती आणि नव-बौद्ध समुदायांसाठी असलेला निधी वळवलाय. इतर विभागांकडून निधी वळवल्याशिवाय लाडक्या बहिणींना पैसे देणे शक्य नाही, असं वित्त विभागाने म्हटलंय.

लाडकी बहीण योजनेच्या सुमारे २ कोटी ३४ महिला लाभार्थी आहेत. या योजनेचे मासिक हप्ते भरल्यामुळे अनेक सरकारी योजनांवर परिणाम होतोय. नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आदिवासी विभागाच्या निधीत ४ हजार कोटी रुपयांची आणि सामाजिक न्याय विभागाच्या निधीत 3 हजार कोटी रुपयांची कपात करण्यात आलीय. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी यावर उघडपणे नाराजी व्यक्त केलीय. आता राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभागाला दिलेला निधी महिला आणि बालविकास विभागाकडे वळवलाय. आदिवासी विभागाचा ३३५.७० कोटी रुपये आणि सामाजिक न्याय विभागाचा ४१०.३० कोटी रुपये निधी महिला आणि बालविकास विभागाकडे वळवण्यात आलाय. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आदिवासी, अनुसूचित जाती आणि नवबौद्ध समुदायांसाठी असलेल्या अनेक योजनांमध्ये कपात करावी लागणार असल्याचे स्पष्ट झालंय.

## महाराष्ट्रावर अवकाळी संकट!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

राज्यातील बहुतांशी शहरांच्या कमाल तापमानात वाढ झाल्यामुळे उन्हाचे चटके बसत असतानाच आता पुढील सात दिवस राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. संपूर्ण कोकण, खान्देश, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, बीड, नांदेड, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती या जिल्ह्यांत ३ ते १० मेपर्यंतच्या आठवड्यात ढगाळ वातावरण राहील. काही ठिकाणी एखाद-दुसऱ्या दिवशी विजांचा गडगडाट, वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. या वातावरणाचा प्रभाव विदर्भातील जिल्ह्यांत जाणवू शकतो. तसंच, गारपिटीचीही शक्यता आहे. मुंबईत सकाळी आकाश ढगाळ असेल, तर दुपारी निरभ्र राहील. महाराष्ट्रात कमाल तापमान ३८ अंशापर्यंत असून तर काही ठिकाणी ४० अंश सेल्सिअसपर्यंत आहे. शनिवारपासूनच्या आठवड्यात तापमान दोन अंश सेल्सिअसने खालावण्याची शक्यता आहे. सध्या महाराष्ट्रात रात्रीचा उकाडा वा कुठेही उष्णतेच्या लाटेची शक्यता नाही.

## पाकिस्तानी हवाई क्षेत्र बंद झाल्याने भारतीय विमान कंपन्यांना तोटा
### खर्चात दरमहा ३०६ कोटींची वाढ, एअर इंडियाला वर्षाला ५००० कोटींचे नुकसान

**■मुंबई । प्रतिनिधी :**

पाकिस्तानी हवाई क्षेत्र बंद राहिल्यास भारतीय विमान कंपन्यांना दरमहा ३०६ कोटींहून अधिक अतिरिक्त खर्च करावा लागू शकतो. दुसरीकडे, एअर इंडियाने असा अंदाज लावला आहे की जर हवाई क्षेत्र एक वर्ष बंद राहिले तर त्यांना ६०० दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे ५०८१ कोटी रुपयांचे नुकसान होईल. यावर मात करण्यासाठी, एअर इंडियाने सरकारला आर्थिक मदत करण्याचे सुचवलं आहे. पीटीआय वृत्तसंस्थेच्या मते, पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी हवाई क्षेत्र बंद केल्याच्या परिणामांवर विमान कंपन्यांनी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाला त्यांचे मत आणि सूचना दिल्या आहेत. मंत्रालयाने काही दिवसांपूर्वी या विषयावर चर्चा करण्यासाठी विमान कंपन्यांशी बैठक घेतली आणि परिस्थिती हाताळण्यासाठी त्यांच्या सूचना मागवल्या.




**आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर दर आठवड्याला ७७ कोटी रुपये अतिरिक्त खर्च**

पाकिस्तानने २४ एप्रिल रोजी भारतीय विमान कंपन्यांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले होते आणि भारताने ३० एप्रिल रोजी पाकिस्तानी विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले होते. विमान कंपन्या पर्यायी उड्डाण मार्गांवरही विचार करत आहेत. उत्तर भारतातील शहरांमधून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणांवर दर आठवड्याला ७७ कोटी रुपये अतिरिक्त खर्च होण्याची शक्यता आहे. हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे इंधनाचा वापर वाढतो आणि उड्डाण कालावधी देखील वाढतो. यामुळे, मंत्रालय विमान भाडेवाढीसह विमान कंपन्या आणि प्रवाशांशी संबंधित पैलूंचे मूल्यांकन करत आहे. याशिवाय, विमान कंपन्या पयार्यी उड्डाण मार्गांवर देखील विचार करत आहेत जेणेकरून उड्डाण खर्च कमी करता येईल.

**हवाई क्षेत्र बंद केल्याने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम**

पाकिस्तानला दक्षिण आशियासाठी लांब मार्ग स्वीकारावा लागेल. भारताने ३० एप्रिलच्या रात्री पाकिस्तानसाठी आपला हवाई क्षेत्र बंद केले होते. पाकिस्तानची सर्व प्रकारची विमाने २३ मे पर्यंत भारतीय हवाई क्षेत्रातून उड्डाण करू शकणार नाहीत. भारताने पाकिस्तानसाठी हवाई दलाच्या जवानांना नोटीस बजावली होती. असे म्हटले होते की जर कोणतेही विमान भारतीय क्षेत्रात आले तर त्यावर कारवाई केली जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्या उच्चस्तरीय बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला. हवाई क्षेत्र बंद केल्याने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होईल. थायलंड, बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका यासारख्या दक्षिण आशियाई देशांमध्ये जाण्यासाठी पाकिस्तानला खूप लांबचा मार्ग स्वीकारावा लागेल. यामुळे तेथील विमान प्रवास महाग होईल.

### ना जात पाहिली, ना धर्म... २५ वर्षात २.५ हजार मुलींचा संसार थाटला
## मुलींचं आई-बापाच्या मायेनं केलं कन्यादान

**■शिर्डी । प्रतिनिधी :**

गेल्या काही वर्षांत वंशाला दिवा पाहिजे म्हणून देशात स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण चांगलेच वाढले होते. विशेष म्हणजे अभिनेता आमीर खानने काही वर्षांपूर्वी सुरू केलेल्या सत्यमेव जयते या कार्यक्रमातूनही देशातील स्त्रीभ्रूण हत्येचं विदारक वास्तव समाजासमोर मांडलं होतं. दुसरीकडे सरकारकडून बेटी बचाव, बेटी पढाओ अभियान राबवत स्त्री जन्माचे स्वागत करण्याबाबत जागृती करण्यात आली. तर, कित्येक कुटुंब आजही पहली बेटी, धन की पेटी, मुलगी ही घरची लक्ष्मी मानत स्त्री जन्माचे मोठ्या उत्साहात स्वागत करत असतात. शिर्डीतील कोते कुटुंबीयांनी देखील स्त्री जन्माच्या स्वागताचा वेगळाच आदर्श समाजाला घालून दिला आहे. स्वतःला मुलगी नाही मात्र गेल्या २५ वर्षात कैलास कोते व त्यांच्या पत्नीने सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून हजारो मुलींचे कन्यादान करत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

कैलास कोते यांच्याकडून राबविण्यात येत असलेल्या सामुदायिक विवाह सोहळ्याचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने यंदाचा सामुदायिक विवाह सोहळा अधिक थाटात संपन्न झाला. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र देणाऱ्या साईंच्या शिर्डीतील या कोते दांपत्याने आत्तापर्यंत विविध धमार्तील अनेक मुलींचा कन्यादान केलंय. सर्वधर्म समभावाची शिकवण देणाऱ्या साई बाबांच्या शिर्डीत कोते दाम्पत्याच्या पुढाकारातून आजतागायत २,५०० जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. यंदाच्या रौप्य महोत्सवी वर्षात हिंदु, मुस्लिम आणि बौद्ध धर्मीय अशी ६५ जोडपी विवाह बंधनात अडकली आहेत. स्वतःला मुलगी नसल्याची खंत मनात असताना २५ वर्षांपूर्वी आईकडून प्रेरणा घेऊन कैलास कोते यांनी सामुदायिक विवाह सोहळ्याची चळवळ हाती घेतली. प्रत्येक वर्षी मोठ्या थाटामाटात सर्वधर्मीय विवाह सोहळा संपन्न होतो आणि त्यामुळे कोते दाम्पत्याला हजारो मुलींचे आई वडील होण्याचे भाग्य लाभले आहे. विशेष म्हणजे या विवाह सोहळ्यात विदर्भ आणि मराठवाड्यातील वधू-वरांची संख्या लक्षणीय असते..

गेल्या २५ वर्षांपासून शिर्डीत सुरू असलेल्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात अवघा एक रुपया शुल्क भरून नोंदणी करता येते. कोते दाम्पत्याकडून वधू-वरांना नवे पोशाख, सोन्याच्या मंगळसूत्राची भेट, संसार उपयोगी वस्तू, वऱ्हाडी मंडळींना मिष्टान्न भोजन दिले जाते. त्यासाठी कोते परिवार आणि नातेवाईक स्वतःच्या मुलींचे लग्न असल्याप्रमाणे तयारी करतात. यावर्षी ६५ जोडप्यांचा विवाह सोहळा मोठ्या थाटात संपन्न झालाय, असे कैलास कोते यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितले. ज्यांचा विवाह याठिकाणी पार पडला, त्यांच्या अपेक्षेपेक्षाही छान नियोजन करण्यात आल्याने वधू-वरही समाधानी होते. अवघ्या एक रुपयात संसाराची सुरुवात होत असल्याने वधू-वरांना आनंद झाल्याचे दिसून आले, असे कैलास यांच्या पती व आयोजक सुमित्रा कोते यांनी म्हटले.



**महागाईमुळे कित्येकांना आधार देणारा सोहळा**

या विवाह सोहळ्यात दरवर्षी मोठ्या संख्येने वऱ्हाडी मंडळींसह शिर्डी ग्रामस्थ उपस्थित असतात. एकीकडे वाढती महागाई आणि पाणी टंचाईच्या काळात 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' चा संदेश देणारा शिर्डीतील हा सामुदायिक विवाह सोहळा अनेकांना आधार देणारा ठरलाय एव्हढं मात्र नक्की, अशा भावनाही काही वर व वधूंनी व्यक्त केल्या आहेत.

**अंघोळ करत असताना आला व्हिडीओ कॉल**

झालं असं की, २३ मार्च रोजी वयस्कर पीडित व्यक्ती अंघोळ करत असताना तिला एक व्हिडीओ कॉल आला. अनोळखी क्रमांकावरुन आलेला का हॉल व्यक्तीने आहे त्या अवस्थेत रिसिव्ह केला. तर कॉलवर समोरच्या बाजूला एक तरुणी नग्नावस्थेत होती. ही पीडित व्यक्ती अर्धनग्नावस्थेत असतानाच समोरच्या तरुणीने हा व्हिडीओ कॉल रेकॉर्ड केला. नंतर अचानक हा कॉल बंद झाला.

## अंघोळ करताना व्हॉट्सअप व्हिडीओ कॉल आला
### समोर नग्नावस्थेतील तरुणी अन् १४ लाखांचा गंडा

**■छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी :**

छत्रपती संभाजी नगरमधीलमधील संदेश नगर येथे सायबर गुन्हेगारीची अत्यंत विचित्र घटना घडली आहे. २३ मार्च रोजी येथील एका व्यक्तीला व्हॉट्सअप कॉल आला. या कॉलवरील महिलेने सदर व्यक्तीचे अर्थनग्नावस्थेतील व्हिडीओ शूट केले. त्यानंतर हे व्हिडीओ दाखवून या व्यक्तीकडून खंडणी वसूल करण्यात आली. महिन्याभराच्या कालावधीमध्ये या व्यक्तीकडून फसवणूक करणाऱ्या सायबर चोरांनी १४ लाख ६६ हजार ७७३ रुपयेंची खंडणी घेतली. अखेर या सततच्या ब्लॅकमेलिंगला कंटाळून पीडित व्यक्तीने पोलिसांकडे तक्रार केली आहे.



**फोन येऊ लागले अन खंडणी वसुलीला सुरुवात**

मात्र काही वेळाने या पीडित व्यक्तीला हेमंत मल्होत्रा नावाच्या व्यक्तीचा फोन आला. या व्यक्तीने पाडित व्यक्तीला तुमचा अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असल्याचं सांगितलं. त्यानंतर प्रमोद राठोड नावाच्या एका व्यक्तीने पोलीस अधिकारी असल्याचं सांगत पीडित व्यक्तीसोबत फोनवर चर्चा केली. या चर्चेदरम्यान त्याने पीडित व्यक्तीला सदर प्रकरणामधून बाहेर पडायचं असेल तर सांगतो तेवढे पैसे दे अथवा तुरुंगात जाण्यासाठी तयार राहा, अशा शब्दांमध्ये धमकावलं. त्यानंतर २३ मार्च ते २८ एप्रिल या एका महिन्याच्या कालावधीमध्ये आरोपींनी या पीडित व्यक्तीकडून १४ लाख ६६ हजार ७७३ रुपयांची खंडणी घेतली.

**इतरांनाही असा लाखो रुपयांचा गंडा घातल्याची शंका**

एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम दिल्यानंतरही या व्यक्तीला केलं जाणारं ब्लॅकमेलिंग थांबलं नाही. अखेर या व्यक्तीने मनातली बदनामीची भीती बाजूला सारत पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या प्रकरणामध्ये पोलिसांना सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तींची नाव मोनी पाटील, हेमंत मल्होत्रा, प्रमोद राठोड, अरविंद सिंग आणि अन्य दोघांचा समावेश आहे. अशाप्रकारे या टोळीने इतरांनाही मोठे आर्थिक गंडा घतला असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता या टोळीचा शोध घेण्याचं काम सुरु आहे.

## जन्मदात्या बापालाच लेकानं संपवलं
### मित्राच्या मदतीने मृतदेह जंगलात फेकून स्वतःलाही नदीत झोकून दिलं

**■गडचिरोली । प्रतिनिधी :**

गडचिरोली जिल्ह्याच्या चामोर्शी तालुक्यातील मार्कंडदेव येथून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात जन्मदात्या बापालाच लेकानं संपवलं असून हत्येनंतर मित्राच्या मदतीने मृतदेह ही जंगलात फेकून दिलाय. मात्र भीतीने हादरलेल्या मुलाने नंतर नदीत उडी घेतली. मात्र, सुदैवाने तो त्यात बचावला. कालांतराने पोलिसांनी सखोल चौकशी केल्यावर अखेर मुलानेच वडिलांच्या हत्येची कबुली दिली आहे. मात्र, या घटनेमुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

मुलासह मित्राला ठोकल्या बेड्या

पुढे आलेल्या माहितीनुसार, जन्मदात्या वडिलांची हत्या करून पोटच्या मुलाने मित्राच्या मदतीने मृतदेह जंगलात फेकला. त्यानंतर वडील बेपत्ता असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात केली. मात्र १५ दिवसांनी मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी चौकशी सुरू केली, त्यामुळे भंडाफोड होण्याच्या भीतीने हादरलेल्या मुलाने नदीत उडी घेतली. मात्र, सुदैवाने तो वाचला. पोलिसांनी सखोल चौकशी केल्यावर अखेर मुलानेच वडिलांच्या हत्येची कबुली दिली आहे. ही खळबळजनक घटना चामोर्शी तालुक्यातील मार्कंडदेव येथे घडली असून या घटनेमुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. पोलीस तपासात घटनेचा उलगडा झाला असून पोलिसांनी मुलासह त्याच्या मित्रालाही अटक केली आहे. रेवनाथ कोडापे (रा. मार्कंडदेव) असे वडिलाचे तर आकाश रेवनाथ कोडापे (वय २९) असे आरोपी मुलाचे आणि लखन मडावी मित्राचे नाव आहे.

**ओढणीने गळा आवळून वडिलांची हत्या**

रेवनाथ हे मार्कंडदेव येथील देवस्थानच्या यात्री निवासमध्ये मजुरी काम करायचे. मुलगा आकाश हा देखील मजुरीकाम करायचा. पिता-पुत्रांमध्ये सतत वाद होत. वडील सतत शिवीगाळ करतात, त्यामुळे आकाशच्या मनात राग होता. त्यातच आकाशने पैसे मागितल्यामुळे वडिलांसोबत त्याचा वाद झाला होता. 15 एप्रिल रोजी पिता-पुत्रातील वाद विकोपाला गेला. या वादात मुलगा आकाशने ओढणीने गळा आवळून वडीलांची हत्या केली. त्यानंतर मित्र लखन मडावीला जीप घेऊन बोलावले. दोघांनी मृतदेह गाडीत टाकून बामनपेठ जंगलात फेकून दिला. दुर्सया दिवशी आकाशने वडील बेपत्ता असल्याची तक्रार चामोर्शी ठाण्यात दिली होती. आता या प्रकरणाचा छडा लागला आहे.





## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भाडेवाढीसोबत सेवाही बेस्ट द्या

बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि वाहतूक उपक्रम अर्थात बेस्ट उपक्रमाने बेस्ट बसच्या तिकीट दरांमध्ये दुप्पट वाढ करण्याचा निर्णय नुकताच घेतलाय. मुंबई महापालिकेपाठोपाठ मुंबई महानगर प्रदेश वाहतूक प्राधिकरणाच्या (एमएमआरटीए) बैठकीतही या तिकीट दरवाढीला हिरवा कंदील मिळाल्याने तिकीट दरवाढीचा मार्ग मोकळा झालाय. ही तिकीट दरवाढ पुढच्या आठवडाभरात लागू होईल, असे म्हटले जाते. या तिकीट दरवाढीमुळे मुंबईकर प्रवाशांच्या खिशाला झळ बसणार असली, तरी बेस्टच्या महसुलात घसघशीत वाढ होईल, असा अंदाज आहे. खरे तर मागच्या काही महिन्यांपासून तिकीट दरवाढीच्या प्रस्तावाची फाईल धूळ खातच पडून होती. कारण सर्वोच्च न्यायालयातील याचिका निकाली निघताच मुंबई महापालिकेची निवडणूक कधीही जाहीर होईल, अशा अटकळी बांधल्या जात होत्या. परिणामी तिकीट दरांमध्ये लगेच वाढ करायची की नाही? करायची तर किती करायची या विचारातच बहुतांश वेळ खर्ची पडला असावा. अखेर गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहावर बेस्ट प्रशासनासोबत बैठक घेतली. या बैठकीत बेस्टने आता महापालिकेकडून मिळणाया निधीच्या कुबड्यांवर चालणे थांबवून स्वतःचे उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावेत, असा मोलाचा सल्ला दिला. मुख्यमंत्र्यांकडून मिळालेल्या या सल्ल्यानंतर बेस्ट प्रशासनाने ताबडतोब भाडेवाढीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करुन टाकले. या तिकीट दरवाढीनुसार ५ किमी अंतरासाठी असलेले बेस्ट प्रवासाचे किमान तिकीट ५ रुपयांवरुन थेट १० रुपये आणि एसी बसकरीता किमान ६ रुपयांवरुन ६ रुपये असे होणार आहेत. त्याचप्रमाणे १० रुपयांचे तिकीट १५ रुपये, १५ रुपयांचे तिकीट २० रुपये, तर २० रुपयांचे तिकीट ३० रुपये होणार आहे. या तिकीट दरवाढीमुळे दररोजच्या ३५ लाख प्रवाशांकडून बेस्ट प्रशासनाला वार्षिक ५९० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळेल. सध्या मिळणाया वार्षिक ८४५ कोटी रुपयांच्या महसुलात हा अतिरिक्त महसूल जोडल्यास बेस्ट प्रशासनाचा वार्षिक महसूल थेट १४०० कोटी रुपयांवर जाईल. मुंबई महापालिकेचा कारभार सध्या प्रशासकाच्या जीवावर सुरू असल्याने मुंबईकरांचे माजी नगरसेवकही अंतर्धान पावलेत. महापालिका निवडणूक कधी होईल, याचा कुणाला काहीच थांगपत्ता नसल्याने तिकीट भाडेवाढीचा हा प्रस्ताव कुठलाही खळखळाट न होता झटपट मंजूर झाला. मुंबईकर प्रवाशांकडून ना त्यावर कुठल्या नकारात्मक प्रतिक्रिया उमटल्या, ना नाराजी व्यक्त झाली. वर्षाच्या सुरुवातीलाच रिक्षा-टॅक्सीचे किमान भाडे अनुक्रमे २३ रुपयांवरुन २६ आणि २८ रुपयांवरुन ३१ रुपये झाले होते. तेव्हा थोड्याफार मुंबईकरांनी नाके मुरडली होती, पण लोकसभा, विधानसभा निवडणुका होऊन गेल्यानंतर सर्वसामान्यांच्या नाराजीला विचारते कोण? याच प्रकारे कधी सीएनजीचे दर वाढले तर, कधी एलपीजीचे. आता बेस्ट बसची भाडेवाढ होत असली, तरी ती अद्यापही रिक्षा-टॅक्सी आणि खासगी कॅब सेवेच्या तुलनेत स्वस्तच राहील. तेवढाच काय तो मुंबईकरांना दिलासा. तिकीट दर वाढवायला हरकत नाही, परंतु बेस्टच्या सेवेचा दर्जा सुधारणे अपेक्षित आहे. एवढीच काय ती सर्वसामान्य मुंबईकरांची बेस्ट प्रशासनाकडून माफक अपेक्षा आहे. बस सेवेचे कंत्राटीकरण झाल्यापासून बेस्टच्या सेवेचा दर्जाही पहिल्याच्या तुलनेत कमालीचा ढासळलाय. कंत्राटदारांनी नेमलेले बस ड्रायव्हर, कंडक्टरच्या अरेरावीला मुंबईकर प्रवाशांना नित्यनेमाने तोंड द्यावे लागते. तुटपुंज्या पगारावर काम करणाया अप्रशिक्षीत किंवा अर्धप्रशिक्षीत कंत्राटी कामगारांकडून अपेक्षा तरी काय ठेवायची. परंतु कामाला जाताना सकाळच्या दिवसाची होणारी नकारात्मक सुरुवात आणि कामावरुन परतताना होणारा नाहक मनस्ताप बेस्ट प्रवाशांना नकोसा वाटतो. नादुरुस्त एसी, त्यात प्रवाशांची तुडूंब गर्दी, तुटलेले दरवाजे-हँडल, अपुरी आसने अशा स्थितीत दम टाकत धावणाऱ्या बसमधून प्रवास करताना कधी एकदा स्टॉपवर उतरतो अशी प्रवाशांची अवस्था झालेली असते. बस स्टॉपवर अर्धा-पाऊण तास ते एक तास वाट बघूनही बस येत नाहीत, अशा एक ना अनेक समस्यांशी झुंज देत सर्वसामान्य मुंबईकर आजही बेस्टमधून प्रवास करतोय. कंत्राटी बस ड्रायव्हरकडून होणाऱ्या अपघातांमध्येही मागच्या काळात बरीच वाढ झालीय. मुंबई महापालिकेकडून मिळणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या निधीवर आतापर्यंत बेस्ट प्रशासनाचा कारभार विसंबून असल्याने प्रशासनाने स्वतःहून सक्षम होण्यास कधी प्रयत्न केल्याचे दिसलेच नाही. पण काळाच्या ओघात मुंबईचा चेहरामोहरा बदललाय. स्वस्तात दर्जेदार सेवा देणाऱ्या मेट्रोचे जाळे महामुंबईत विस्तारलेय. या पार्श्वभूमीवर आता बेस्टनेही प्रवाशांना दर्जेदार सेवा पुरवण्याकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. ग्लोबल मानकानुसार प्रत्येक १ लाखांच्या लोकसंख्येमागे ६० प्रवासी बस असणे आवश्यक असते. प्रत्यक्षात मुंबईत १ लाख प्रवाशांमागे केवळ २० बसच धावतात. म्हणूनच प्रवाशांना बस स्टॉपवर ताटकळत उभे राहावे लागते किंवा गर्दीत चेंगरावे लागते. सध्या बेस्टच्या ताफ्यात केवळ २,७८३ बस आहेत, यामध्ये ८७५ इलेक्ट्रिक बस आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत किमान ७ हजार बसची आवश्यकता आहे. बेस्टने स्वमालकीच्या बस वाढवण्याची गरज आहे. अधिकाधिक इलेक्ट्रिक बस खरेदी करुन इंधन खर्च वाचवला पाहिजे, कंत्राटी चालक, कंडक्टरऐवजी प्रशिक्षित चालक, कंडक्टर ताफ्यात सामावून घेतले पाहिजेत. नव्या वसाहती, इंडस्ट्रीयल इस्टेट, शॉपिंग मॉल्स, मेट्रो सेवांना कनेक्टिव्हीटी देणारे नवे मार्ग आखले पाहिजेत. प्रवाशांच्या संख्येनुसार मोठ्या बस, मिनी, एसी बसची सेवा दिली पाहिजे. मोठ्या बस आगारांमध्ये व्यावसायिक गाळे, थिएटर, कँटींन आदी उभारुन त्यातून अतिरिक्त महसूल मिळवला पाहिजे. बेस्टने केवळ तिकीट दरवाढीच्या महसुलावर अवलंबून राहता कामा नये. प्रवाशांना बेस्ट सेवा मिळाली, तरच ही प्रवासी सेवा भविष्यात टिकून राहील. त्यामुळे सेवेत सुधारणेचाही प्राधान्याने विचार व्हायला हवा.

# राफेलचा करार झाला, पण वेळेत मिळायला हवीत!

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानं भारत-पाक सीमेवरील तणाव वाढलेला असतानाच भारतानं फ्रान्सकडून ४.५ जनरेशनची २६ अ‍ॅडव्हान्स राफेल मरीन फायटर जेट्स खरेदीचा करार केला आहे. तब्बल ६३ हजार कोटी रुपयांचा हा करार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली २३ एप्रिल रोजी झालेल्या सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीच्या (सीसीएस) बैठकीत या विमानाच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली होती.

ही मंजुरी मिळताच भारत-फ्रान्समध्ये हा आजवरचा सर्वात मोठा सुरक्षाविषयक करार झाला. या करारांतर्गत फ्रान्सच्या दसॉ एव्हिएशन कंपनीकडून भारताला २२ सिंगल सीटर आणि ४ ट्विन-सीटर राफेल मरीन फायटर जेट्स विमाने मिळतील. दोन देशांतील या करारात जेटची देखभाल, लॉजिस्टीक सपोर्ट, नौदल कर्मचार्यांना प्रशिक्षण, यासह भारतात तयार होणाया काही भागांकरिता तांत्रिक सहकार्याचीही समावेश आहे. राफेल मरीन नौदलाच्या ताफ्यात दाखल होताच हिंद महासागरात भारतीय नौदलाच्या लढाऊ क्षमतेला नवीन आयाम मिळेल, असं म्हटलं जातं.

सध्या हिंद महासागरात चिनी नौदलाचा अत्यंत सक्रीय वावर आहे. चिनी नौदलाचं आक्रमक धोरण पाहता शक्ती संतुलन राखण्याच्या दृष्टिकोनातून भारतीय नौदलाच्या हवाई ताफ्यात राफेलचा समावेश महत्त्वाचा आहे. यामुळं भारतीय नौदलाची फायटर पॉवर नक्कीच वाढेल. परंतु या करारामुळं लगेचच चीन वा पाकच्या उरातही धडकी भरेल, असे नाही. एका वृत्तानुसार या फायटर जेट्सची डिलिव्हरी २०२८-२९ मध्ये सुरू होईल आणि सर्व फायटर जेट्स २०३१-३२ पर्यंत भारताला मिळतील.

भारतीय नौदलाकडं सध्याच्या स्थितीत आयएनएस विक्रमादित्य आणि आयएनएस विक्रांत अशी २ विमानवाहू जहाजे आहेत. या दोन्ही जहाजांवर रशियन बनावटीची जुनी मिग २९के लढाऊ विमाने तैनात आहेत. विक्रांतचं डिझाईनच मिग २९ के ला ध्यातात ठेवून करण्यात आलं होतं. परंतु कमी ऑपरेशनल क्षमता, विविध तांत्रिक समस्या,

राफेल मरीन नौदलाच्या ताफ्यात दाखल होताच हिंद महासागरात भारतीय नौदलाच्या लढाऊ क्षमतेला नवीन ऊर्जा मिळेल, असं म्हटलं जातं. सध्या हिंद महासागरात चिनी नौदलाचा अत्यंत सक्रीय वावर आहे. चिनी नौदलाचं आक्रमक धोरण पाहता शक्ती संतुलन राखण्याच्या दृष्टिकोनातून भारतीय नौदलाच्या हवाई ताफ्यात राफेलचा समावेश महत्त्वाचा आहे. यामुळं भारतीय नौदलाची फायटर पॉवर नक्कीच वाढेल. परंतु या करारामुळं लगेचच चीन वा पाकच्या उरातही धडकी भरेल, असे नाही. कारण फ्रान्ससोबत करार झाला तरी ही फायटर जेट्स प्रत्यक्ष मिळायला काही अवधी लागणार आहे.



सुट्या भागांची कमतरता एका अनेक कारणांमुळे या जुन्या लढाऊ विमानांच्या देखभाल दुरुस्तीवर नौदलाला मोठा खर्च करावा लागत आहे.

म्हणून नौदल मागच्या काही वर्षांपासून मिग २९ के विमानांचा पर्याय ठरु शकेल अशा डेक-बेस्ड् फायटर जेट्सच्या शोधात होतं. त्याकरीता नौदलानं ट्विन इंजिन डेक-बेस्ड फायटर जेट्सच्या प्रोग्रामवरही काम सुरू केलं. नौदलानं अशा किमान १४५ फायटर जेट्सची गरज नोंदवली होती. परंतु या प्रोग्राममधील डिझाईन, टेक्निकल बदल व त्यात होणारा विलंब पाहता स्वदेशीवर अडून न बदण्याचं धोरण नौदलानं स्वीकारलं.

स्वदेशी तेजसचीही चाचणी नौदलानं घेऊन बघितली. स्वदेशी बनावटीच्या तेजसलाही आजमावून बघण्यात आलं. परंतु मेळ न जमल्यानं ५७ लढाऊ विमानं खरेदी करण्याची योजना नौदलानं आखली. या अंतर्गत २०२२ मध्ये गोव्यात फ्रान्सच्या राफेल मरीन आणि अमेरिकेच्या बोईंग एफ-ए १८ सुपर हॉर्नेट या लढाऊ विमानांच्या चाचण्याही घेण्यात आल्या. परंतु राफेल-एम हे एकमेव फायटर जेट भारतीय नौदलाच्या विमानवाहू जहाजांकरिता उत्तम पर्याय म्हणून पुढं आलं. राफेल मरीनआधी भारतानं फ्रान्सकडून हवाई दलासाठी ३६राफेल जेट्स खरेदी केलेली आहेत.

२०१६ मध्ये झालेल्या ५८ हजार कोटींच्या या करारांतर्गत सर्व लढाऊ विमानं २०२२ मध्येच भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात दाखल झाली आहेत. हे सर्व राफेल जेट्स हवाई दलाच्या अंबाला आणि हशिनारा हवाई तळांवरून ऑपरेट होतात. राफेल मरीन हवाई दलाच्या ताफ्यातील राफेलपेक्षाही अधिक प्रगत आहेत. भारतीय नौदलाच्या गरजेनुसार ही विमानं कस्टमाइज करण्यात आली आहेत.

त्यातही महत्त्वाचं म्हणजे भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात आधीपासूनच राफेल फायटर जेट्स असल्यानं पायलट्सना टेक्नॉलॉजिचं प्रशिक्षण देण्याकरीता नव्यानं पायाभूत सुविधा उभारणं, देखभाल दुरुस्तीसाठी अ‍ॅसेम्ब्ली लाईन उभारण्याची गरजही पडणार नाही आणि त्यात फारशा अडचणीही येणार नाहीत. प्रगत रडार तंत्रज्ञान, अधिक शस्त्रे वाहून नेण्याची क्षमता, आधुनिक सेन्सर्स या जोरावर राफेल-एम हे फायटर जेट्स मिग-२९ के च्या तुलनेत अधिक कार्यक्षम ठरतं.

फोल्डिंग विंग असलेलं हे फायटर जेट अत्यंत कमी जागेत लँडिंग करु शकतं, जेटचा वेग प्रतितास १९१२ किमी असून हे जेट मॅक २ च्या वेगाने उडू शकतं. हिमालयाच्या पर्वतरांगांवरून अत्यंत थंड हवामानातही उड्डाण करण्याची क्षमता असलेलं हे जेट ५० हजार फूट उंची गाठू शकतं. न्यक्लिअर प्लांटवर हल्ला करणं, पाणबुड्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर हल्ला करण्यास हे जेट सक्षम आहे. या जेट्समध्ये अँटी शिप क्षेपणास्त्रे, मिटीयोर आणि हॅमर क्षेपणास्त्रे देखील बसवण्यात येतील.

सध्या भारत-पाकिस्तान सीमेवरील तणाव पाहता प्रामुख्यानं आयएनएस विक्रांतवर या फायटर जेट्सची आवश्यकता आहे. पुढील ३ ते ५ वर्षांत ही लढाऊ विमानं आयएनएस विक्रांत व आयएनएस विक्रमादित्यच्या ताफ्यात दाखल होतील. राफेल मरीन फायटर जेट्स या दोन्ही जहाजांवर तैनात झाल्यास भारतीय नौदलाला मलाक्का सामुद्रधुनी आणि दक्षिण चीन समुद्रासह इतर वादग्रस्त भागांत देखरेख ठेवणं सोपं होईल.

मुख्य म्हणजे भारतीय नौदल या भागात अधिक कार्यक्षमतेनं गस्त घालू शकेल. परिणामी हिंद महासागर क्षेत्रात भारताचा प्रभाव वाढेल. आशिया-पॅसिफिकपासून हिंद महासागरापर्यंत प्रत्येक देश नौदलाला केंद्रस्थानी ठेवून आपली ताकद वाढवत आहे. एकीकडे चीनची कुरघोडी वाढत असताना या समुद्री क्षेत्रात चीनवर वचक ठेवण्याकरीता भारतीय नौदलाची ताकद वाढणंही महत्त्वाचं आहे. हेच काम राफेल मरीनमुळं होईल.

नौदलाला किमान ५७ जेट्सची गरज असताना २०३०पर्यंत २६ जेट्स मिळतील, त्यातही २६ पैकी २२ जेट्सच प्रत्यक्ष वापरात असतील, तर उरलेले ४ जेट्स प्रशिक्षणाकरीता उपयोगात येतील. म्हणजेच नौदलाला ३१ जेट्स कमतरता कायम असेल. ही कमतरता भरून काढण्याकडंही प्राधान्यानं लक्ष द्यायला लागेल. एकतर स्वदेशी प्रोग्रामला चालना द्यावी लागेल किंवा पुन्हा इतर देशांकडून जेट खरेदीचा पर्याय स्वीकारावा लागेल.

भारतीय हवाई दलाची अवस्था काही वेगळी नाही. भारतीय हवाई दलाला चौथ्या पिढीतील प्रगत ४.५ जनरेशनच्या लढाऊ विमानांची कमतरता भासत आहे. भारतीय हवाई दलाला लढाऊ विमानांच्या किमान ४२ स्क्वॉड्रनची आवश्यकता असताना, प्रत्यक्षात हवाई दलाकडं सुमारे ३० स्क्वॉड्रनच आहेत. यामध्ये जग्वार, मिराज-२००० आणि मिग-२९ यांचा समावेश आहे. पुढील ५-७ वर्षांत यातील अनेक विमाने निवृत्त होतील.

पुढील काही महिन्यांत मिग-२१ विमानं देखील स्क्वाड्रनमधून हटवली जातील. या लढाऊ विमानांना पर्याय म्हणून भारतीय हवाई दलानं हिंदुस्थान एअरोनॉटिक्स लि. (एचएएल) ८३ तेजस मार्क-१ए लढाऊ विमान तयार करण्यासाठी २०२१ मध्ये ४६,८९८ कोटी रुपयांचं कंत्राट दिलं होतं. त्यानुसार एचएएल २०२४ ते २०२८ दरम्यान ८३ तेजस मार्क-१ए लढाऊ विमानं नौदलाला सुपूर्द करणार होते. परंतु जेट्ससाठी आवश्यक इंजिनच एचएएलला अमेरिकन कंपनी जनरल इलेक्ट्रिकल (जीई)कडून मिळली नाहीत.

एचएएलनं जीई कंपनीसोबत ९९ जीई-४०४ इंजिनांच्या खरेदीचा करार केला आहे. या ९९ इंजिनांपैकी पहिलं इंजिन २ वर्षांच्या विलंबानंतर हाती येण्याची शक्यता आहे. परिणामी या जेट्सच्या डिलिव्हरीला २०२८ साल उजाडणार असल्याचं दिसतं. याशिवाय अ‍ॅडव्हान्स मल्टिरोल फायटर कॉम्बॅट एअरक्राफ्ट अर्थात अ‍ॅम्का विमानांसाठी जीई आणि एचएएल मिळून जीई ४१४ इंजिनांची निर्मिती भारतात करण्यास प्रयत्नशील आहे.

हे सर्व प्रोग्राम मागील कित्येक वर्षांपासून रेंगाळतच सुरू आहेत. ११४ विमानांच्या खरेदीचं टेंडरही धूळ खात पडून आहे. तेजस मार्क-१ ए लढाऊ विमानं मिळण्यास विलंब होत असल्यानं एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी फेब्रुवारीतील एअरो इंडिया शो मध्ये एलएएलच्या कारभारावर जाहीर नाराजी दर्शवली होती. मी जे जेट उडवलं ते तेजस मार्क-१ए जेट नव्हतंच, असा दावा एअर चीफ मार्शल सिंह यांनी केला होता.

केवळ कॉकपिट आणि सॉफ्टवेअर बदलल्यानं विमान अत्याधुनिक होत नाही, तर ते उडण्यास सक्षम आणि शस्त्रसज्ज असायला हवं होतं, असं एअर चीफ मार्शल म्हणाले होते. सध्याची सीमेवरील तणावाची स्थिती लक्षात घेता पाकिस्तानच नाही, तर चीनचाही एकाचवेळी सामना करण्याची जिगर भारतीय हवाई दलात आहे. अत्याधुनिक फायटर जेट्सची गरज पूर्ण होताच ही ताकद व क्षमता कैक पटींनी वाढेल.

# देशात बेटिंगचा नवा विळखा?

पैज लावणे आपल्यासाठी काही नवीन नाही. एखादा म्हणतो, "आज अमुक शिक्षक येणार नाहीत." आपण विचारतो, "कशावरून?" समोरचा उत्तरतो, "मी सांगतो म्हणून, चल, लावतो पैज?"

हे असे संवाद आपल्या लहानपणी अनेकदा झडलेले आहेत. काही खेळ पैज लावून खेळले जायचे. साहित्याचा विचार केला तर खुद्द ज्ञानेश्वर माउलींनीही ज्ञानेश्वरीत आपल्या मायमराठीचे कवतिक करताना 'अमृतातेही पैजा जिंके' अशी लोभस शब्दयोजना केली आहे. खेळीमेळीच्या वातावरणात लावली जाणारी पैज बघता बघता नागिणीसारखा फूत्कार कधी सोडू लागली ते कळलेच नाही. पैजेचे रुपांतर पैसे लावून खेळल्या जाणाऱ्या जुगारात झाले. या नागिणीने अनेकांना कंगाल केले, देशोधडीला लावले, कुटुंबे उद्ध्वस्त केली. हे कमी म्हणून की काय, अलीकडे आधीच मोबाईलचे व्यसन लागलेले अनेकजण जाहिरातींमधून दाखवल्या जाणाऱ्या बेटिंग अ‍ॅपच्या जाळ्यात फसत आहेत.

हे सर्व का घडत आहे याचा विचार केला तर एक गोष्ट लक्षात येईल, ती म्हणजे सतत केला जाणारा जाहिरातींचा मारा, आणि या माऱ्याद्वारे दाखवली जाणारी अविश्वसनीय प्रलोभने. हे सर्वसाधारणपणे कधी आढळते याचा आढावा घेतला तर समजेल की क्रिकेटचा हंगाम सुरु व्हायच्या आधीपासून; आणि आपण एखादे अ‍ॅप डाउनलोड केले असेल, तर त्याच्या माध्यमातून किंवा आपण मोबाईल गेम खेळताना वारंवार दिसणाऱ्या जाहिरातींमधून. हे कमी म्हणून की काय, एसएमएसचाही मारा चालू होतो

पैज लावण्याचा निरागस प्रकार आज जुगार म्हणून नावारुपाला आला आहे आणि त्याची व्याप्ती वाढत आहे. बेटिंग हे नाव या जुगाराने धारण केले आहे. यात लाखो-करोडोंची उलाढाल होत असून, सामान्य माणसे, तरुण मुले यात फसत आहेत, फसवले जात आहेत. ऑनलाईन अ‍ॅपचा यातील वाटा वाढत आहे.




आणि त्यातून 'तुमच्या खात्यात अमुक इतकी नाणी बोनस म्हणून जमा झाली आहेत. ती वापरून हा गेम खेळा' अशा अथार्चे संदेश येतात.

पैज लावणे हा प्रकार प्रत्यक्षात दोघा-तिघांमध्ये घडतो; तर बेटिंगमध्ये अनेकजण सहभागी होत असतात. ही वेगवेगळी अ‍ॅप्स डाउनलोड करायला सांगणाऱ्या कंपन्या कुठल्या आहेत, त्या कितपत विश्वासार्ह आहेत, असे अनेक मुद्दे आहेत. क्रिकेटचे उदाहरण घेतले, तर अमुक सामन्यात अमुक फलंदाज शतक ठोकेल का, कोणता फलंदाज सर्वात जलद अर्धशतक पुरे करेल, कोणता गोलंदाज सर्वात जास्त बळी घेईल, कोण सर्वात जास्त झेल पकडेल, किती चौकर किंवा षटकार ठोकले जातील, अशा विविध प्रश्नांवर पैसे लावले जातात.

जिंकणाऱ्याला जी रक्कम मिळते त्यासाठी काही अटीही असू शकतात. हरणाऱ्याचे पैसे बुडतात. अर्थात फायदा कमावणे हा एकमेव उद्देश असल्याने कोणी हरो वा कोणी जिंको, अ‍ॅप बनवणाऱ्या कंपनीला बक्कळ फायदा होतो. जिंकणारा लोभापायी अधिक रक्कम लावायला लागतो, तर हरणारा झालेले नुकसान भरून काढण्यासाठी खेळत राहतो. शिवाय या सर्वांना इरेस पेटविण्यासाठी अनेक नामांकित, तारांकित खेळाडू, चित्रपट तारका-तारे, मनोरंजन क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती हजर असतातच.

बेटिंग हा प्रकार किती सोप्पा आहे, माझा कसा दणदणीत फायदा झाला, तुमचा कसा प्रचंड फायदा होईल, वगैरे गोडगोड शब्दात सांगून जाळ्यात ओढले जाते. हे कमी म्हणून की काय, दर दोन मिनिटांनी कोणत्या ना कोणत्या पान मसाल्याच्या जाहिरातीही असतात. मध्यंतरी ज्या एका अ‍ॅपने धुमाकूळ घातला. त्यात 'फक्त रु.४९ गुंतवा आणि जिंका लाखो रुपये', असे सांगितले जायचे. एका संस्थेने गोळा केलेल्या प्रतिक्रिया कोणाही सुज्ञ माणसाची काळजी वाढवणाऱ्या आहेत. एका माणसाच्या गावात राहणाऱ्या दोन अल्पवयीन पुतण्यांनी '४९ रुपये भरा आणि करोडो जिंका' असे सांगितले तेव्हा तो हादरला. दुसरा एकजण आयपीएलच्या मोसमात एका रिक्षातून चालला होता, तेव्हा तो रिक्षावाला या अ‍ॅपसाठी सभासद गोळा करीत आहे असे कळले. 'मी स्वतः दहा लाख रुपये जिंकले' असे तो रिक्षावाला म्हणाला, तेव्हा तो थापा मारतोय असे त्या प्रवाशाला वाटले.

छोट्या शहरात आणि खेड्यातसुद्धा हे वेड भयानक वेगाने पसरत चालले आहे, अशी चिंता एकाने व्यक्त केली. कोणत्याही प्रकारच्या नशेपेक्षा ही नशा अधिक संहारक आहे असे एकाने सांगितले. ज्यांचे पैसे बुडाले ते अक्षरशः कंगाल झाले. कोणाशीही बोलायची चोरी, म्हणून अनेकजण बेपत्ता झाले. जेव्हा कोणतीही व्यक्ती एखादी नशा करू लागते, मग ती दारू असो, धूम्रपान असो, मादक पदार्थ असोत किंवा बेटिंगसारखा जुगार असो, त्या व्यक्तीच्या एकंदरीत वागण्यात हळूहळू बदल होऊ लागतो.

आपण जे करतोय ते चुकीचे आहे हे त्या व्यक्तीला कळत असते, पण वळत नाही. त्यामुळे अशी व्यक्ती आपल्याच कुटुंबात एकटे राहणे पसंत करते. काहीतरी बहाणे सांगणे, खोटे बोलणे हेही वाढू लागते. स्वतःची मिळकत नसेल, तर चोरी करण्याइतकी सराईत होऊ लागते. कशातही मन लागत नाही. अभ्यास असो, घरातली किंवा ऑफिसमधली कामे असोत, चुकारपणा वाढतो. बेटिंगच्या बाबतीत हे सर्व लागू होतेच, शिवाय वारंवार मोबाईलवर संबंधित अ‍ॅप उघडून पाहणे, आपण जे व्यवहार केलेत, त्यांची स्थिती तपासणे चालू होते. उधारी वाढू लागते. ज्यांच्याकडून पैसे घेतले, त्यांचा ससेमिरा वाढतो. या सर्वांमुळे ही व्यक्ती मानसिकदृष्ट्या पूर्ण उद्ध्वस्त होऊ शकते.

अनेक पाश्चात्य राष्ट्रात जुगाराला, बेटिंगला कायद्याने मान्यता असली, तरी आपल्याकडे ती नाही. मग यावर उपाय काय? मारझोड करून, अपशब्द बोलून, अपमान करून अशी व्यक्ती सुधारत नाहीच, पण उलट अधिक कोडगी बनू शकते. त्यामुळे तिच्याशी प्रेमानेच बोलायला हवे, तिला विश्वासात घेऊन नक्की काय झालेय ते जाणून घ्यायला हवे. मानसोपचार तज्ज्ञांचीही मदत घ्यावी. कोणतेही व्यसन एकदम सुटत नाही, काही वेळ जाऊ द्यावा लागतो, त्यामुळे त्या व्यक्तीच्या जवळच्या सर्वांनी धीर धरावा, संयम सोडू नये. सुरक्षेचा उपाय म्हणून हेच नव्हे, तर असे कोणतेही संशयास्पद अ‍ॅप आढळले, तर cybercrime.gov.in या संकेतस्थळावर जाऊन तशी तक्रार करावी. आपले नातेवाईक, मित्रमंडळी यांनाही सावध करावे. खरे तर ज्या प्रकारे अशा अ‍ॅप्सचा प्रसार होत आहे, खेळाडू, कलाकार मंडळी भूल घालणाऱ्या जाहिरातीतून सतत लोकांसमोर येत आहेत, ते पाहता या विरोधात एक मोठी सामाजिक चळवळ उभी करणे आणि समाजात जागृती करणे गरजेचे आहे.




# नव-सर्जनाची उद्यमी लाट

मन राज कपूरच्या चित्रपटांमध्ये गरिबीला तोंड देणारा किंवा भोळा-भाबडा नायक आणि अल्लड नायिकेचे प्रेमबंध यांची मधुर संगीताच्या जोडीने गुंफण असायची. 'फिर भी दिल है हिंदुस्तानी' असे हिंदीत गाणाऱ्या या नायकाने आणि राज कपूर यांच्या चित्रपटशैलीने जगात सर्वदूर रसिकांच्या मनावर अधिराज्य केले. 'राजा हरिश्चंद्र'पासून सुरू झालेल्या भारतीय चित्रपटसृष्टीने कथा, आशय, संगीत, अभिनय या सर्वांच्या जोरावर अनेक आविष्कार दाखविले आणि आपल्या बदलत्या रूपाने जगाच्या कानाकोपऱ्यातील चित्रपटप्रेमींची मने जिंकली.

आजही पाश्चात्त्य जगातील व्यक्तींना अमिताभ, शाहरूख खान, माधुरी दीक्षित, काजोल यांसह अनेक भारतीय तारेतारका परिचित असतात. जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेला भारतीय मनोरंजन उद्योग आज एका नव्या लाटेवर स्वार झाला आहे. या मनोरंजन उद्योगाला आज ओटीटीच्या नव्या तंत्राचे परिमाण लाभले आहे. केवळ मनोरंजनच नव्हे, तर एकूणच दृकश्राव्य माध्यमांचे अंतरंग आणि बाह्यरंग यात आमूलाग्र क्रांती झाली आहे. सर्जनशीलतेचा हा नवा मळा आहे आणि त्यात तरुणांची कल्पकता, प्रतिभा दररोज बहरती आहे. दृकश्राव्य माध्यमांमध्ये आलेल्या या नव्या उद्यमशीलतेच्या लाटेचा सुयोग्य वेध पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वेव्हज' म्हणजेच 'वर्ल्ड ऑडिओव्हिज्युअल आणि एंटरटेनमेंट समीट' या दृकश्राव्य व मनोरंजन क्षेत्रातील जागतिक शिखर परिषदेत घेतला.

मुंबई ही चित्रनगरी म्हणूनही जगाला ज्ञात आहे, त्या मुंबापुरीत या उद्योगावर विचारमंथन होते आहे, हे भविष्यवेधी असे पाऊल आहे. भारतात या आणि संपूर्ण जगासाठी नवनिर्मिती करा, असा नवा मंत्र पंतप्रधानांनी ९० देशांच्या प्रतिनिधींपुढे बोलताना दिला. गेल्या दशकभरात ओटीटीचे माध्यम खुले झाल्यापासून चित्रनिर्मिती, त्यातील आशय, अभिनय, दिग्दर्शन या साऱ्याची प्रक्रिया ग्रामीण आणि दुर्गम पातळीपर्यंत झिरपली आहे, हे या माध्यमाचे यश आहे. ओटीटी वापरणाऱ्यांची संख्या आता ५० कोटींपर्यंत असून सुमारे साडेपाच अब्ज डॉलर इतकी महसूलप्राप्ती या क्षेत्रातून होते आहे. ओटीटीचा सुमारे ५० टक्के आशय हा बिगरमेट्रो शहरांतून किंवा ग्रामीण भागांतून येतो आहे. प्रादेशिक भाषांमधील आशयाचे प्रमाण वाढले आहे. पारंपरिक हिरो-हिरोइनच्या व्याख्येत न बसणारे चेहरे आज घराघरांत पोहोचले आहेत.

स्टोरीटेलिंग म्हणजेच कथाकथन हे आपल्या देशातील वैविध्यपूर्ण संस्कृतीचे बलस्थान आहे आणि तंत्रज्ञानआधारित नव्या माध्यमांमध्ये त्याने एक नवे दालन खुले केले आहे. सबटायटल्स, डबिंग, स्थानिक पातळीवरची लोकेशन्स या सर्व बाबतीत त्यातून भरघोस रोजगार तयार होत आहेत. अ‍ॅनिमेशन, व्हीएफएक्स गेमिंग यांनाही भारतीय संदर्भात बसविण्याचे आव्हान तंत्रकुशल तरुणांनी स्वीकारले आहे. भ्रमंतीची आवड असणारे अनेक तरुण आज विविध ठिकाणचे व्हिडिओ ब्लॉग चित्रित करतात. त्यातून पर्यटनउद्योग, रेस्तराँ आणि खाद्यपदार्थ उद्योग, क्रीडा प्रबोधिनी, गायन-वादन कला या सर्व क्षेत्रांना प्रोत्साहन मिळते.

स्त्री-पुरुष, जात-पात-धर्म, समाज, शहरी-ग्रामीण यांच्या कक्षा ओलांडून या माध्यमांतून वास्तविक कथन समोर येत आहे. अशा अब्जावधी कहाण्यांमधून अब्जावधी डॉलरची एक नवी अर्थव्यवस्था आपल्याला खुणावते आहे. या बदलांचे स्वागत करतानाच काही पथ्येही लक्षात ठेवावी लागतील. आडात असेल तर पोहऱ्यात येणार, हे सर्व कंटेन्ट क्रिएटर्सना लक्षात ठेवावे लागेल. मैफलीला केवळ एकदा लाखो लाइक्स मिळवून उपयोग नाही, तर सूर मुळातच सच्चा आणि पक्का हवा. वास्तवाची जाण देणारी 'स्टोरी' कितीही तगडी असो, त्यातील व्यक्तींबाबतची संवेदनशीलता मनांत जागृत हवी. कुणाच्या खासगी आयुष्यात किती डोकावायचे, त्याचे स्वयंनियमन हवे. भाषा प्रवाही तर हवी, परंतु बंधने नाहीत म्हणून केवळ प्रेक्षक मिळविण्याकरिता शिव्यांची लाखोली नको. हे अर्थातच ज्याचे त्याने ठरवायचे आहे. सरकारी पातळीवर याबाबतीत महसुली उद्दिष्टांप्रमाणेच अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य कसे टिकवायचे, समाजात तेढ निर्माण होणार नाही याद्दष्टीने कितपत नियमन हवे असे अनेक मुद्दे राहणारच. कृत्रिम प्रज्ञेचा आयाम हा आणखी एक नवा पैलू या क्षेत्रात असेल.



# छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

# तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

**सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :**



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

# धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्सची

**चेहऱ्यावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे'!

**फायदेशीर उपाय -** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेहऱ्याला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणाऱ्या बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये 86.3% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेहऱ्यावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.





**साहित्य-**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

# म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

**म्हातारपणात** मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

**हृदयरोग**

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

**कर्करोग**

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

**स्ट्रोक**

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



# असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



# टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

**फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.**

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

**महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?**

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.



# सर्व काही आरोग्यासाठी

**स्त्रीचे** आरोग्य म्हणजे फक्त गर्भारपण व बाळंतपणाच्या वेळचे आरोग्य नव्हे. खरे म्हणजे त्या वेळचे आरोग्य जर सर्व दृष्टीने सुदृढ राखावयाचे असेल तर त्याची काळजी तिच्या जन्मापासूनच घेतली पाहिजे. सुदृढ स्त्रीच सुदृढ आणि कार्यक्षम माता होऊ शकते. म्हणूनच स्त्रीच्या आरोग्याची काळजी व त्यासाठी लागणाऱ्या सुविधा तिला जन्मापासून मिळाल्या पाहिजेत. आयुष्याच्या सर्व टप्प्यांत सुदृढ असलेली स्त्री स्वतः तर स्वावलंबी बनेलच, पण समाजविकासाच्या कार्यालाही हातभार लावील. म्हणून सर्वांनी एकत्र येऊन स्त्रियांना स्वतंत्र, सुदृढ व संपूर्ण जीवन जगण्यास शिकवले पाहिजे. केवळ होणाऱ्या अन्यायासाठी एकत्र न येता आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठीसुद्धा स्त्रियांनी एकत्र यायला हवे.

# ॲक्ने, ब्लॅकहेडचा त्रास दूर करण्यासाठी कसा कराल मुलतानी मातीचा वापर

**त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी पूर्वीपासून मुलतानी मातीचा वापर केला जातो. या आयुर्वेदिक उपायामुळे ॲक्ने, कळवंडलेली त्वचा, सनटॅन कमी करण्यास मदत होते. मात्र आजकाल कॉस्मेटिक क्रीम्स आणि उपाचारांचा वापर अधिक केला जातो. मात्र त्याचा काही दुष्परिणाम त्वचेवर होऊ शकतो. म्हणूनच हा धोका टाळण्यासाठी मुलतानी माती हा सुरक्षित आणि नैसर्गिक उपाय वापरणे अधिक फायदेशीर आहे.**



**कशी ठरते मुलतानी माती फायदेशीर?**

▮ मुलतानी मातीमध्ये मॅग्नेशियम क्लोराईडचे प्रमाण आढळते. यामुळे ॲक्नेचा त्रास कमी होण्यास मदत होते.

▮ तेलकट त्वचेवर मुलतानी मातीचा वापर केल्यास अतिरिक्त तेल आणि त्वचेचा तेलकटपणा कमी होतो. तसेच पुन्हा पिंपल येण्याचे प्रमाण कमी होते.

▮ चेहऱ्यावर मुलतानी मातीचा फेसपॅक लावल्याने त्वचेवरील मळ कमी होतो. तसेच तेल आणि मृतपेशींचा थर कमी होतो.

▮ मुलतानी मातीमुळे त्वचेवर थंडावा निर्माण होतो. त्यामुळे डाग, लालसरपणा कमी होतो.

▮ उन्हात फिरल्याने होणारे सनटॅन, पिंगमेंटेशनचा त्रास कमी होण्यास मदत होते.

▮ व्हाईटहेड्स, ब्लॅकहेड्सचा त्रास कमी होण्यासाठी मुलतानी माती फायदेशीर ठरते.

▮ चांगल्या आयुर्वेदिक भंडार / दुकानामधून घेतलेल्या मुलतानी मातीचा त्वचेवर मुळीच दुष्परिणाम होत नाही.



## त्वचेच्या प्रकार ओळखून त्यानुसार कसे कराल मुलतानी मातीचे फेसपॅक

**तेलकट त्वचेसाठी**

तुमची त्वचा तेलकट असल्यास योग्य फेसवॉशची निवड करून चेहरा नियमित धुवा. तसेच मुलतानी मातीचा फेसपॅक बनवताना त्यामध्ये गुलाबपाणी आणि चिमूटभर हळद मिसळा. हा पॅक चेहऱ्यावर आणि मानेवर पातळ थराच्या उंचीचा लावा. हा नैसर्गिकरीत्या सुकू द्या. त्यानंतर पाण्याने स्वच्छ धुवा. हा पॅक लावल्यानंतर चेहऱ्याची फार हालचाल करू नका. बोलू नका.

**सामान्य त्वचेसाठी**

■ सामान्य त्वचेवर मुलतानी मातीचा वापर करताना मुलतानी मातीची पेस्ट गुलाबपाण्याऐवजी दुधात बनवावी.

■ ॲक्नेचा त्रास कमी करण्यासाठी मुलतानी मातीचा वापर करत असल्यास मुलतानी मातीसोबत कडुलिंब, कापूर आणि गुलाबपाण्याचा वापर करा. हा पॅक चेहऱ्यावर आठवड्यातून एकदा लावावा.

■ पिंपल्सचे डाग, खुणा कमी करण्यासाठी मुलतानी माती वापरत असल्यास त्यामध्ये टोमॅटोचा रस मिसळा. सोबतच चंदन, हळदीचा या फेसपॅकमध्ये समावेश करू शकता.

■ चेहऱ्यावर काळे डाग असल्यास मुलतानी मातीमध्ये दही, पुदिन्याची पानं याची पेस्ट मिसळून तयार पॅक चेहऱ्यावर डाग असलेल्या जागी लावावा. अर्धा तासानंतर हा पॅक कोमट पाण्याने स्वच्छ धुवावा.

■ चेहऱ्यावरील त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी तुम्ही मुलतानी मातीसोबत काही इसेन्शिअल ऑईल मिसळू शकता.



# सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खा आणि रोग टाळा

**सकाळी :** सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खाणे खूप फायदेशीर आहे, यामुळे शरीर स्वस्थ राहते आणि रोग जवळपास देखील येत नाही. स्प्राउटेड चणे संपूर्ण किंवा वाटून साखर आणि पाण्यासोबत खाल्ल्याने शरीरातील प्रोटीनचे प्रमाण कायम राहते. तसेच स्नायू देखील मजबूत होतात. कोणत्याही स्वरूपात स्प्राउटेड चणे वापरणे फायदेशीर आहे. हे सलाड म्हणून देखील वापरले जातात. यामध्ये प्रोटीन, विटामिन आणि फायबरचे असलेले प्रमाण तणाव दूर करण्यास मदत करते.



## स्प्राउटेड चणे वापरण्याचे ८ फायदे

▮ चण्यामध्ये फायबरची मात्रा जास्त राहते. भिजवून खाल्ल्याने पोट किंवा कब्जा संबंधी समस्या टाळता येते.

▮ मूत्र समस्या असल्यास किंवा पुन्हा पुन्हा मूत्र येत असेल तर चणा अत्यंत फायदेशीर आहे.

▮ रिकाम्या पोटी चणे खाण्याने शरीरात अतिरिक्त प्रमाणात ग्लुकोज बनत नाही. मधुमेह देखील नियंत्रणात राहतो.

▮ मानसिक तणाव असलेल्या लोकांसाठी चणा खूप फायदेशीर आहे.

▮ सकाळी वाटलेल्या चण्यासोबत साखर किंवा पाणी मिसळून प्यायल्याने मानसिक तणाव दूर होतो.

▮ कावीळ असलेल्या रुग्णांनी नियमितपणे चणे खावे. हे बरेच फायदेशीर असतात.

▮ स्प्राउटेड चणे हिरव्या मुगासोबत खाल्ल्याने खाण्याने प्रोटिनची मात्रा वाढते.

▮ याच्या नियमित सेवनाने थकवा दूर होण्यास मदत मिळते.

# नाचता नाचता व्यायाम!

**झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. एरोबिक्स, बॉलीवूड डान्स आणि झुंबा.. सध्या हे व्यायाम प्रकार प्रचंड लोकप्रिय आहेत. ३१ डिसेंबरला आणि नववर्षात छान 'फिट' दिसायचे 'लक्ष्य' ठेवून तरुणांबरोबर मध्यमवयीन वर्गही 'जिम'कडे वळतो आहे. मुळात नाचता नाचता व्यायाम होऊन जाणार ही संकल्पनाच आकर्षक आणि मजेशीर वाटावी अशी आहे. या व्यायाम प्रकारांनी शरीराला नेमका कसा व्यायाम होतो ते जाणून घेऊया एरोबिक्स ट्रेनर डॉ. पलक कुलकर्णी यांच्याकडून..**

**एरोबिक्स**

सत्तरच्या दशकातच परदेशात एरोबिक्स लोकप्रिय होऊ लागले होते. त्यानंतर लोकांनी त्यांच्या व्यायामाच्या गरजेनुसार इतर प्रकार शोधून काढायला सुरुवात केली. 'झुंबा'ची सांगितली जाणारी जन्मकथाही मजेशीर आहे. ज्या व्यक्तीने हा झुंबा शोधला तेही एरोबिक्स ट्रेनर होते. एका दिवशी त्यांची एरोबिक्सची सीडी विसरली आणि लॅटिन प्रकारच्या डान्स सीडीवरून व्यायाम प्रकार घेतले गेले आणि त्यातून झुंबा आला असं म्हटलं जातं. पण झुंबा असो की बॉलीवूड डान्स. सगळ्याचा पाया एरोबिक्स हाच! एरोबिक्स म्हटलं म्हणजे तालबद्ध कवायत डोळ्यासमोर येते. पण उगीचंच कशाही उड्या मारणे किंवा इकडे-तिकडे वळून व्यायाम करणे म्हणजे एरोबिक्स नव्हे. हा प्रकार खूप व्यवस्थित आणि विचारपूर्वक ठरवलेल्या 'स्टेप्स'वर करायचा असतो. रोज तेच तेच करायचा कंटाळा येऊ नये म्हणून सतत वेगवेगळ्या 'कॉम्बिनेशन्स'मध्ये हालचाली केल्या जातात. त्यामुळे आज एरोबिक्समध्ये नवीन काय करणार याची उत्सुकता टिकून राहते. एरोबिक्समध्ये 'फ्लोअर एरोबिक्स' व 'बेंच एरोबिक्स' असे दोन प्रकार आहेत.

फ्लोअर एरोबिक्समध्ये सुरुवातीला 'वॉर्मअप' व्यायाम करावे लागतात. यातही नुसते कसेही हात-पाय हलवून चालत नाही. वॉर्मअपच्याही ठरलेल्या स्टेप्स असतात. त्यालाच जोडून ३० ते ४० मिनिटे पोटावरील स्नायूंना (ॲब्ज) तसेच कमरेखालच्या व वरच्या शरीराला व्यायाम दिला जातो. एरोबिक्समध्येसुद्धा बॉलीवूड डान्सच्या काही स्टेप्स करता येतात. ते करताना लोकांना मजा येते. व्यायामाची क्षमता म्हणजे 'स्टॅमिना' कमी असणाऱ्यांना या प्रकाराने सुरुवात करता येईल. जे लोक खूप वर्षांपासून एरोबिक्स करत आहेत त्यांना मात्र बेंच एरोबिक्स हा प्रकार अधिक आवडतो असं दिसून येतं. यातही वॉर्मअप असतोच. पण प्रत्यक्ष व्यायाम 'बेंच'वर म्हणजे ठरावीक उंचीच्या मोड्यांवर साधारण ३० मिनिटांसाठी असतो. कमरेखालचे आणि वरचे शरीर व हृदय यांच्यासाठी हा चांगला व्यायाम आहे. यात बेंचच्या स्टेप्स चढणे व उतरण्यात पायांचाही खूप वापर होतो.

## झुंबा आणि बॉलीवूड डान्स

झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. यातली संगीत व गाणी ठरलेली असतात. संगीत हेच झुंबाच्या आकर्षणाचे केंद्र आहे. संगीताच्या तालावर पाय आपसूक थिरकायला लागतात आणि नाचायचा हुरूप येतो. ७-८ वर्षांपूर्वीपासून झुंबा आपल्याकडे आला आणि हळूहळू लोकप्रियही होऊ लागला. बॉलीवूड डान्समध्येही वॉर्मअप चुकत नाही. पुढची ३० ते ४० मिनिटे व्यायाम करायचा असल्याने तो गरजेचा असतो. यात रोज हिंदी चित्रपटातील वेगळे गाणे घेऊन त्यावर शरीराला व्यायाम होईल, अशा प्रकारे नाचाच्या स्टेप्स बसवल्या जातात. यातला कोणताही नाच शिकणे व करणे अवघड नसते हे महत्त्वाचे.

गटाने करायच्या व्यायामात अनेकांना नवे मित्र भेटतात हे देखील व्यायाम लोकप्रिय होण्यामागचे कारण असू शकेल. एकट्यानेच चालायला किंवा पळायला जाणे किंवा एकट्यानेच जिममध्ये जाऊन व्यायाम करणे अनेकांना कंटाळवाणे वाटते आणि थोड्या दिवसांनी 'जिम'चा उत्साहसुद्धा कमी कमी होत जातो. याउलट संगीताच्या तालावर नाचण्याचा कंटाळा येत नाही, शिवाय बरोबरीच्या गटातले सगळेच नाचत असतात. त्यामुळे नव्याने आलेल्या व्यक्तीचा उत्साह टिकतो.

# महाराष्ट्र दिनी उद्धव ठाकरे परदेशवारीवर

## महायुतीनं साधला निशाणा, मराठी अस्तित्वाचा उल्लेख करत म्हणाले....

**■मुंबई :** ६५वा महाराष्ट्र दिन नुकताच पार पडला, जिथं अनेक नेतेमंडळींनी बहुविध कार्यक्रमांमध्ये हजेरी लावत महाराष्ट्र दिन साजरा केला. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मात्र या दिवशी कोणत्याही कार्यक्रमाला दिसले नाहीत. उलटपक्षी ते परदेशात सुट्टीसाठी गेल्याची बाब समोर आली आणि सत्ताधाऱ्यांनी त्यांच्यावर कडाडून टीका केली. मुंबईत महाराष्ट्र दिनाच्या सोहळ्यासाठी ठाकरेंची अनुपस्थिती महायुतीच्या हाती त्यांच्यावर टीका करण्यासाठी आयतं कोलित देऊन गेली.

भाजपचे मुंबई अध्यक्ष आणि राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर थेट निशाणा साधत ज्या मराठी अस्तित्वावरून ते भाष्य करतात त्याकडेच त्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप शेलार यांनी केला. 'एखादा नेता जो मराठी गौरवाविषयी वक्तव्य करत असतो त्यानं महाराष्ट्राच्या अतिशय महत्त्वाच्या दिवसाला बगल देणं अयोग्यच आहे', असं ते म्हणाले.

शेलारांच्या मागोमाग आता शिंदेंच्या शिवसेनेशी हातमिळवणी केलेल्या संजय निरुपम यांनीसुद्धा ठाकरेंवर निशाणा साधला. 'महाराष्ट्रासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना जेव्हा श्रद्धांजली वाहण्याची वेळ आली तेव्हा ठाकरे कुटुंबानं मात्र परदेशी सुट्टीसाठी जाण्याचा पर्याय निवडला', अशा शब्दांत निरुपम यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली.



**राज्यातील नेतेमंडळींची विविध कार्यक्रमांना हजेरी**

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह सत्तेतील आणि विरोधी पक्षातील नेतेमंडळींनी महाराष्ट्र दिनाच्या निमित्तानं विविध कार्यक्रमांना हजेरी लावली होती. संयुक्त महाराष्ट्रासाठीच्या चळवळीत बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना नेतेमंडळींनी आदरांजली वाहिली पण, या साऱ्यामध्ये उद्धव ठाकरे मात्र कुठेच दिसले नाहीत.

इथं सत्ताधाऱ्यांनी ठाकरेंच्या या भूमिकेवर निशाणा साधलेला असतानाच संजय राऊतांना ज्यावेळी यासंदभार्तील प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यांनीसुद्धा या प्रश्नाला बगल दिली. दरम्यान तिथं महायुतीनं महाराष्ट्र दिनी एकजूट दाखवत राजकीय वर्तुळात साऱ्यांचच लक्ष वेधलं हेसुद्धा तितकंच खरं.

# पॅलेस्टाईनसोबत आमचा धर्म जुळलाय, झेंडे जाळाल तर विरोध करू : अबू आझमी

**■मुंबई :** समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी पुन्हा एकदा गरळ ओकली आहे. पहलगाम हल्ल्याबाबत बोलताना अबू आझमी म्हणाले की, दहशतवादी आरामात आले, पर्यटकांना गोळ्या मारुन निघून गेले. यावर भारत सरकारने चिंतन केले पाहिजे. तसेच पॅलेस्टाईनसोबत आमचा धर्म जुळला आहे, असं वादग्रस्त विधानही अबू आझमी यांनी केलं आहे. दरम्यान फिलिपाईन्सचे झेंडे जाळाल तर विरोध करू, अशी जाहीर भूमिका अबू आझमींनी स्पष्ट केली.



**अबू आझमींनी औरंगजेबचेही केलं होतं समर्थन-**

अबू आझमी यांनी मार्च 2025 मध्ये औरंगजेबचे समर्थन करणारे विधान केले होते. या विधानामुळे महाराष्ट्र विधानसभेत गोंधळ उडाला आणि त्यांना संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले. त्यांनी नंतर हे विधान मागे घेतले, परंतु तरीही त्यांच्यावर धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप ठेवण्यात आला आणि न्यायालयाने त्यांना जबाबदारीने वक्तव्य करण्याचा सल्ला दिला.

जात विचारून साहित्य खरेदी करायला सांगणारेही दहशतवादी आहेत, असा निशाणा अबू आझमींनी नाव न घेता मंत्री आणि भाजपचे आमदार नितेश राणेंवर साधला. तसेच भारतामध्ये आता माणुसकी शिल्लक राहिली नाही. मुस्लिमांना अनेक ठिकाणी त्रास दिला जातोय. देशात धर्म विचारून कारवाई होत असल्याचा आरोप देखील अबू आझमी यांनी केला आहे. अबू आझमींनी केलेल्या या विधानानं आता नवा वाद पेटण्याची शक्यता आहे. तसेच आता भाजपकडून काय प्रत्युत्तर मिळणार हे पहाणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे.

# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचा प्रथम क्रमांक

**■भाईंदर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांमध्ये ७ कलमी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम राबवण्यासाठी निर्देश दिले होते. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांना गुणांकन देण्याची प्रक्रिया विविध स्तरावर नेमून दिलेली होती. त्यानुसार सर्व पोलीस आयुक्तालयांचे मुल्यांकन क्वालिटी कंट्रोल ऑफ इंडिया यांच्याकडे होते. गुरूवारी महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या निकालामध्ये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करुन पोलीस आयुक्तालयांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला असून आयुक्तालयाला १०० पैकी ८४.५७ गुण मिळाले आहेत. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या ७ कलमी कार्यक्रमाच्या गुणांकन पद्धतीनुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने कामगिरी केली आहे.



या गुणांकन पद्धतीमध्ये संकेतस्थळ, सुकर जीवनमान, कार्यालयीन सोयीसुविधा, ई-ऑफीस व ई-बीट प्रणाली, आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन, नाविन्यपूर्ण उपक्रम या महत्वाच्या मुद्यावर काम करण्यात आले. पोलीस आयुक्तालयाच्या सर्व पोलीस ठाणे, सर्व कार्यालयांमध्ये येर्णाया तक्रारदार नागरिकांची तक्रार दाखल करेपर्यंत गैरसोय न व्हावी या अनुषंगाने उपाययोजना करण्यात आल्या.

ई-ऑफीस व ई-बीट प्रणाली- आयुक्तालयातील सर्व कार्यालयांमध्ये १०० टक्के ई-ऑफिस कार्यप्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त मधुकर पांडे व अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १ प्रकाश गायकवाड, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२, पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उपायुक्त परिमंडळ-३ जयंत बजबळे तसेच आयुक्तालयातील सर्व अधिकारी व अंमलदार यांनी चांगली कामगिरी केल्याने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयास राज्यातील पोलीस आयुक्तालयांमध्ये प्रथम क्रमांक मिळाला आहे.

## रोहा नगरपरिषदेच्या अभियंत्यावर जीवघेणा हल्ला...

# ३० एप्रिलच्या मध्यरात्री काय घडलं



**■पनवेल :** रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे अभियंता ओंकार भुरण यांच्यावर बुधवारी (३० एप्रिल) मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास जीवघेणा हल्ला करून जखमी केले होते. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी शुक्रवारी (२ मे) कन्हैया पडवळ याला अटक करण्यात आली आहे तर दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. दरम्यान, या हल्ल्याचा निषेध करून हल्लेखोरांवर कडक कारवाई करावी, या मागणीसाठी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी जोरदार निदर्शने केली.

दमखाडी येथे भूमिगत गटार लाईनच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. दिवसा वाहतूक आणि वर्दळ असल्यामुळे हे काम रात्र केले जात होते. सुरक्षिततेसाठी गटार लाईन मॅनहोलच्या बाजूला दगड ठेवण्यात आले होते. बुधवारी (३० एप्रिल) रात्री ११ वाजता दुरुस्तीचे काम सुरु केल्यानंतर मध्यरात्री १ च्या सुमारास कन्हैया यदुराम पडवळ (दमखाडी, रोहा) कारमधून आला. त्याच्यासोबत आणखी एकजण होता. त्यांनी कार मॅनहोलच्या समोर उभी केली. त्यावेळी पाणीपुरवठा अभियंता ओंकार भुरण यांनी गटार दुरुस्तीचे काम सुरु असल्याने गाडी मॅनहोलपासून दूर उभी करण्यास सांगितले. यावर मला सांगणार तू कोण, मी इथलाच आहे, मी माझे बघून घेईन, असे कन्हैयाने उत्तर दिले. तेव्हा भुरण यांनी ते अभियंता असून गटाराचे काम सुरू असल्याचे सांगितले.

यानंतर कन्हैया पडवळने ओंकार भुरण यांची मान पकडली आणि त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली. एवढेच नाही तर त्यांचा शर्टही फाडला. शिवाय कन्हैयासोबत असलेल्या व्यक्तीने गाडीतून स्टीलचा रॉड काढून भुरण यांना जोरदार फटका मारला. त्यामुळे भुरण यांना गंभीर दुखापत झाली. त्यानंतर कन्हैयाने भुरण यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी भुरण यांच्या तक्रारीनंतर रोहा पोलिसांनी सरकारी सेवेत असलेल्या अधिकाऱ्याला मारहाण करणे, धमकी देणे तसेच सरकारी कामात आढथळा निर्माण करणे इत्यादी कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी शुक्रवारी कन्हैयाला अटक केली आहे. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

"आम्ही रोहेकरांच्या सेवेसाठी दिवसरात्र काम करत आहोत. आमच्या कर्मचाऱ्यांना केलेली मारहाण म्हणजे अत्यंत निषेधार्य आहे. आम्ही काळ्या फिती लावून याचा निषेध केला आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी!"

**-अजय एडके, मुख्याधिकारी, रोहा अष्टमी नगरपरिषद**

जोपर्यंत कठोर कारवाई होत नाही तोपर्यंत आम्ही काळ्या फिती लावून काम करणार आहोत. पोलिसांनी लावलेली कलमांना जामीन मिळणार आहे. शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ला झाल्याने कठोर कलमे लावण्यात यावीत."

**-सचिन दळवी, अध्यक्ष, म्युनिसिपल एम्पॉईज युनियन.**

# पहलगाम हल्ल्यावर सुबोध पाटील काय म्हणाले, हल्ल्यानंतर १० दिवसांनी पनवेलमध्ये दाखल

**■पनवेल :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेले पनवेलमधील (कामोठे) सुबोध पाटील शुक्रवारी (२ मे) घरी परतले आहेत. त्यांच्यासोबत पत्न दिखील श्रीनगरमध्ये थांबल्या होत्या. दोघेही आज त्यांच्या कामोठ्यातील रॉयल हेरिटेज अपार्टमेंटमधील घरी सुखरूप पोहोचले. त्यांना पाहून आनंदित झालेले त्यांचे कुटुंबीय आणि सोसायटीमधील रहिवाशांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केले होते. त्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात कामोठ्यातील सुबोध पाटील जखमी झाले होते. या हल्ल्याचा थरारक अनुभव सुबोध पाटील यांनी सर्वांना सांगितला.





सुबोध पाटील यांनी आवर्जून सांगितले की, तिथे माझ्यावर चांगले उपचार करण्यात आले. रुग्णालयात भेटायला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले होते. त्यांनी गप्पा मारल्या. राहुल गांधी यांनीही भेट घेऊन विचारपूस केली. सरकारकडून उत्तम सहकार्य करण्यात आले. सात दिवस चांगले उपचार केल्यावर बरे वाटू लागले. त्यानंतर परत पाठवण्यात आले.

मागून कसला तरी आवाज येत होता. परंतु, नेमके काय सुरू आहे, ते कळत नव्हते आणि मागे पाहण्याची हिंमत होत नव्हती. तो आवाज सलगपणे सुरूच होता आणि तिथे असलेले लोक सैरावैरा पळत होते. त्यामुळे काहीतरी भयंकर घडल्याचे आमच्या लक्षात आले. आम्हीही खूप घाबरलो होतो आणि वाट मिळेल त्या दिशेने पळत होतो. काही अंतर गेल्यावर समोरच काही लोक बसलेले दिसले. आम्ही घाबरलेलो आणि थकलेले असल्यामुळे आम्हीही तिथे बसलो, असे पाटील यांनी सांगितले.

मात्र, त्यानंतर वेगळेच घडले. अचानक एक दहशतवादी आमच्यासमोर उभा राहिला. त्याने थेट, तुमच्यापैकी जे हिंदू आहेत, त्यांनी उभे राहा असे सांगितले. मात्र, त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता त्याने गोळ्या झाडायला सुरुवात केली. कुणालाच काही कळेना. आरडाओरड झाला, लोक किंचाळू लागले. मला गोळी लागली आणि जखमी अवस्थेत कोसळलो. अनेक तासांनी शुद्ध आली, तेव्हा माझ्या आजूबाजूला मृतदेह पडलेले पाहिले. ते दृष्य खूप भयानक होते. ज्या स्थानिकाने मला बैसरन खोऱ्यात नेले होते त्याने मला ओळखले आणि प्यायला पाणी दिले. त्यानंतर पाठीवर घेऊन मला तिथून बाहेर काढले. तोच मला बाईकवरून खाली घेऊन आला आणि लष्कराच्या ताब्यात दिले. लष्कराच्या जवानांनी माझ्यावर प्राथमिक उपचार केले आणि रुग्णालयात दाखल केले. तिथून मला हेलिकॉप्टरने लष्करी रुग्णालयात नेण्यात आले. तिथे सात दिवस माझ्यावर उपचार सुरू होते, असे सुबोध पाटील यांनी सांगितले.

# मनपाच्या अग्निशमन विभागात पदोन्नती घोटाळा?

**■भाईंदर :** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी पदोन्नती देताना अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) यांना डावलून त्यांच्या जागी यंत्रचालक व पंप ऑपरेटर यांना पदोन्नती देण्याचा प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे प्रामुख्याने अनुभवी आणि पात्र कर्मचाऱ्यांना डावलून त्याठिकाणी कमी अनुभवी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी आस्थापना विभागांनी पालिका आयुक्तांकडे पदोन्नतीचा प्रस्ताव सादर केला आहे. यात आर्थिक व्यवहार होऊन खालच्या कर्मचाऱ्यांना पात्र ठरवून त्यांना पदोन्नती देण्याचा घाट सुरू आहे,असा आरोप होत आहे. महापालिकेत एकूण सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी पदाची २४ पदे मंजूर आहेत. त्यात ५ भरलेली आहे, तर उर्वरित पदे ही रिक्त आहेत.



"अग्निशमन विभागाची पदोन्नतीची प्रक्रिया ही नियमानुसार असून मंजूर सेवा प्रवेश नियमानुसार करत आहोत. यात कोणावरीही अन्याय होणार नाही. यात काहीही चुकीचे नाही आहे."

**-कल्पिता पिंपळे, उपायुक्त मुख्यालय, मिरा -भाईंदर महानगरपालिका.**

महापालिकेत वर्षानुवर्षे महापालिका स्थापन झाल्यानंतर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी २०२३ साली प्रसारीत केलेली होती. त्यात अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) आणि यंत्रचालक ही दोन्ही पदांची एकत्रित सेवा जेष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावरही हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. अग्निशन विभागात अग्निशमन प्रणेता (लिडींग फायरमन) आणि यंत्रचालक ही दोन्ही पदे एकत्रित करून सेवा ज्येष्ठता यादी प्रसारित करण्यात आली आहे. मुळात ही दोन्ही पदे वेगळी मंजूर आहेत. तसेच त्यांचे काम सुद्धा वेगळे आहे. परंतु,दोन्ही पदांकरिता एकत्रित सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करून अग्निशमन प्रणेता (लिडींग फायरमन) या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा ज्येष्ठतेनुसार अन्याय केला जात आहे, असा आरोप होत आहे.

याबाबत वेगवेगळी सेवा ज्येष्ठता प्रसिद्ध करून पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे. तर यात मंजूर सेवा प्रवेश नियमानुसार मिरा-भाईंदर महापालिकेत एक मुख्य अग्निशमन अधिकारी पद असून त्यावर मागील कित्येक वर्षांपासून प्रभारी म्हणून एक अधिकारी कार्यरत आहे. अग्निशमन विभागात सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी २४ पदे मंजूर आहेत. त्यात ५ पदे हि भरलेली आहेत. उर्वरित १९ पदे ही रिक्त आहेत. सद्यस्थितीत पदोन्नतीसाठी पात्र असलेले २७ अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) कार्यरत आहेत. तर यंत्रचालक यांची ७५ पदे मंजूर आहेत. त्यात सध्यस्थितीत ११ यंत्रचालक कार्यरत आहेत. उर्वरित ६४ पदे हि रिक्त आहेत. अग्निशमन प्रणेता (लिडिंग फायरमन) पदे ३९ मंजूर आहेत. त्यातील १२ रिक्त आहेत. कार्यरत २७ आहेत. तर अग्निशमन विभागात कायम स्वरूपी २१ फायरमन कार्यरत आहेत. तर कंत्राटी १०० अग्निशामक, ५० मजूर कार्यरत आहेत. त्यासोबत ५ सफाई कामगार, ४ मजूर असे आहेत. तर यात ७५ टक्के कर्मचारी हे पदोन्नती तर २५ टक्के सरळसेवेने भरती करायचे आहेत. तर सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी यांना पदोन्नती देताना सर्वात प्रथम अग्निशामक प्रणेता (लिडिंग फायरमन) पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या किंवा 'चालक-यंत्रचालक' या पदावर ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या किंवा वरील संवर्गात पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने, पद रिक्त असल्यास, 'अग्निशामक' या पदावर १० वर्षे सेवा झालेल्या कर्मचायांना पदोन्नती सेवाज्येष्ठता आणि गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल असे आहे.

# सिमेंटचे ब्लॉक बनविणाऱ्या कंपनीत ड्रग्ज कारखाना

**■वसई :** वसई येथील सिमेंटचे ब्लॉक बनविण्याच्या कंपनीतून सुरू असलेला मेफेड्रॉन (एमडी) बनविण्याचा कारखाना साकीनाका पोलिसांनी उद्धवस्त केला. या कारवाईत चार किलो ५३ ग्रॅम एमडी ड्रग्ज हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला. त्याची किंमत आठ कोटी चार लाख रुपये आहे. पोलिसांनी या कारवाईत सादिक सलीम शेख (२८) आणि सिराज सुलतान पंजवानी (५७) यांना अटक केली आहे.साकीनाका पोलिसांचे अमली पदार्थविरोधी पथक २४ एप्रिल रोजी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना येथील काजुपाडा परिसरातील रेतीवाला कंपाऊंडमध्ये सार्वजनिक शौचालयाजवळ सादिक हा संशयास्पदरीत्या फिरताना सापडला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याजवळ १० लाख सात हजार रुपये किमतीचे ५३ ग्रॅम एमडी ड्रग्ज सापडले.

पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून सादिकला अटक केली. त्याच्या चौकशीत त्याने एका व्यक्तीकडे एमडी विक्रीचे काम करत असल्याचे आणि त्याला मिरा रोडमधील रहिवासी सिराज पंजवानी हा अमली पदार्थ पुरवत असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दिली. साकीनाका पोलिसांनी आरोपी पंजवानी याचा मिरा रोडमध्ये शोध घेऊन त्याला २६ एप्रिल रोजी अटक केली. वसईतील कामण गावातील काळुराम चौधरी हा एमडी बनवून विकत असल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार, साकीनाका पोलिसांनी चौधरी चालवत असलेल्या एम. के. ग्रीन एएसी ब्लॉक कंपनीवर छापा टाकला. सिमेंटचे ब्लॉक बनविर्णाया या कंपनीत चौधरी सापडला नाही. पण पोलिसांना येथील एका शेडमध्ये एमडी अमली पदार्थ बनवले जात असल्याचे दिसले. या शेडमधून चार किलो एमडी आणि एमडी बनवण्याचे साहित्य जप्त केले.



# नवी मुंबईत चिमुरड्यासोबत दुष्कृत्य

**■नवी मुंबई :** नवी मुंबईतील सीवूड्स येथील डीपीएस शाळेत शिकणाऱ्या ४ वर्षाच्या विद्यार्थ्यावर शाळेच्या स्कूल बस चालकाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना दोन ते तीन दिवसांपूर्वी घडली. याप्रकरणी एनआरआय पोलिसांनी पोक्सो कायद्यांतर्गत बसचालकावर गुन्हा दाखल करत त्याला अटक केलेली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांसह पालक वर्गात भीतीचे वातावरण पसरलेले आहे. त्यामुळे या घटनेच्या निषेधार्थ २८ एप्रिल रोजी सकाळी पालकांनी शाळेवर धडक देत आक्रोश मोर्चा काढला. यावेळी मोर्च्यात पालक वर्ग मोठ्या संख्येने सामील झाले होते. या मोर्च्यात मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी देखील सक्रिय सहभाग दाखवत निषेध नोंदवला. यावेळी निषेध असो, निषेध असो, शाळा प्रशासनाचा निषेध असो, सहआरोपी करा, सहआरोपी करा, शाळेच्या मुख्याध्यापकांना सहआरोपी करा, अटक करा, अटक करा, शाळेच्या मुख्याध्यापकांना अटक करा, निलंबन करा, निलंबन करा, शाळेच्या मुख्याध्यापकांचे निलंबन करा अशा घोषणा पालक व मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांचे गैरवर्तनाबाबत पालकांनी माध्यमांसमोर तक्रारींचा पाढा वाचला. हातावर काळ्या फिती लावून पालक व मनसे पदाधिकारी यांच्याकडून निषेध नोंदविण्यात आला.




# लाच स्विकारताना सरपंचाला अटक

**■विरार :** वाडा: तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सापरोंडे -मागाठणेच्या लोकनियुक्त सरपंच शोभा गवारी (३६ वर्षे) यांना एकोणीस हजाराची लाच घेताना लाचलुचपत ठाणे विभागाने अटक केली आहे. ग्रामपंचायत कार्यालय विस्तारिकरणाच्या कामासाठी मंजूर केलेल्या बिलापोटी ठेकेदाराकडून दोन टक्के म्हणजे वीस हजारांची लाच गवारी यांनी मागितली होती. सापरोंडे मागाठणे या ग्रुप ग्रामपंचायतचे विस्तारीकरण करण्यात आले होते. या कामासाठी मंजूर असलेल्या बिलासाठी काम करणार्या ठेकेदाराकडून सरपंच गवारी यांनी दोन टक्के लाचेची मागणी केली होती ही रक्कम २०००० इतकी होती. मात्र काम केल्यानंतर हे लाच मागितली जाते हे तक्रारदार ठेकेदाराला मान्य नव्हते म्हणून त्यांनी यासंदर्भातील तक्रार लाचलुचपत विभागाच्या ठाणे पथकाला दिली. २४ एप्रिल रोजी पथकाने या प्रकरणाची पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तथ्य आढळले. लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ठाणे पथकाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी सापरोंडे गावामध्ये २५ एप्रिलला सापळा रचला. सरपंच गवारी यांनी २० हजाराच्या लाचेमध्ये तडजोड करत तक्रारदार यांच्याकडून १९ हजार रुपयांची लाच स्वीकारली. त्यांच्याकडे झाडाझडती घेतली असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला त्यांच्याकडून १९ हजार रुपये व एक मोबाईल मिळून आला त्यावेळी प्रतिबंधक विभागाने सरपंचांना ताब्यात घेतले पथकाने सरपंच गवारी हिच्या विरोधात वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. असून न्यायालयाने गवारी यांना तीन दिवसांची (सोमवारपर्यंत) पोलीस कोठडी दिली होती. ही कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक संजय गोविलकर, सुहास शिंदे, पोलीस निरीक्षक संतोष अंबिके, पोलीस कर्मचारी शेख, सुरवाडे, विशे यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com